# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५.०५.२०२४**

## अवैधरित्या विनापरवाना रेती चोरी करणा—या आरोपीतांवर कारवाई

दिनांक ०५.०५.२०२४ रोजी फिर्यादी हे स्टाफ सह पोलीस स्टेशन कन्हान परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अश्या विश्वसनीय खबरेवरून माहीती मिळाल्याने तारसा चौक कन्हान येथे नाकाबंदी करून एक **१६ चक्का ट्रक क्र एम.एच ४० सी एम ७७५२ यामध्ये अवैधरित्या विना परवाना १० ब्रास रेती किमती ५०,००० व १ अॅन्ड्रॉइड मोबाईल किमती १०,०००/ रू व १६ चक्का ट्रक क्र एम.एच ४० सी एम ७७५२ किमती ४०,००,०००/रू असा एकुन ४०,६०,००० रू असा माल जप्त करून ताब्यात घेण्यात आला. न**मुद गुन्हयातील आरोपी नामे— १.अरविंद जगदिश साकेत वय वर्ष रा देवरी राज्य एम.पी ह.मु चनकापुर खापरखेडा २. बलराम यादव वय ३६ वर्ष रा चनकापुर खापरखेडा ३. क्रिष्ना यादव वय ४० वर्ष रा चनकापुर खापरखेडा **जि नागपुर** यांचेवर पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३७९,१०९ सहकलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४,२१ खान व खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार,(भापोसे) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोलीस अंमलदार प्रणय बनाफर, कार्तीक पुरी, बालाजी बारगुले सर्व नेमणुक विषेश पोलीस पथक नागपूर यांनी पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.**



## अवैधरित्या विना परवाना रेती चोरी करणा—या आरोपीतांवर कारवाई

पोलीस स्टेशन वेलतुर येथे दिनांक ०५.०५.२०२४ रोजी फिर्यादी हे स्टाफसह परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना अवैधरित्या विना परवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अश्या विश्वसनीय खबरेवरून माहीती मिळाल्याने आंभोरा पुनर्वसन येथे नाकाबंदी करून येणा—या वाहनांची तपासणी केला असता यातील आरोपी हा आपले वाहनात **एक ब्रास काळी रेती विना परवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने ट्रॅक्टर क्र. एम.एच. २९ बी. व्ही. २४६७ स्वराज कंपणीच्या लाल रंगाच्या ट्रॅक्टर व बिना क्रमांकाची ट्रॉली ज्याची ट्रॉलीसह किंमत ३,५०,०००/व एक ब्रास काळी रेती किंमत ३,०००/—रू. असा एकुण ३,५३,०००/रू. चा मुद्देमाल ची दिसुन आल्याने आरोपी नामे— १) नाशिक रामु उके वय २५ वर्ष रा. चन्ना ता. कुही जि. नागपुर २) मधुकर कुर्जेकार रा. गोन्हा** यांचेवर पोलीस स्टेशन वेलतुर येथे कलम ३७९,१०९ सकलम ४८(७)(८)महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४,२१ खान व खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार,(भापोसे) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक सतिश पाटील, पोहवा हरीदास चाचरकर, सफौ अशोक जाधव यांनी पार पाडली.


## जनावरांना निर्दयतेने कोंबुन नेणा—या आरोपीतांवर कारवाई
## १८ जनावरांना मिळालेले जिवनदान
## ३ आरोपींवर कारवाई एकुण १७२००००/— रू चा मुद्देमाल जप्त

**पोस्टे सावनेर येथे दिनांक ०५/०५/२०२४ चे ००/१५ ते ०१/३० वा दरम्यान यातील फिर्यादीला गोपनिय माहीती मिळाल्यावरून धापेवाडा चौक अंबिका हॉटेल समोर बॅरीकेटींग लावुन नाकाबंदी केली असता यातील नमुद आरोपी यांनी आपले ताब्यातील आयशर वाहन क्रमांक एम एच २० जीसी ५८३४ मध्ये आपले ताब्यातील वाहनात जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून घेऊन जातानी मिळून आल्याने त्यांचे ताब्यातुन १८ काळ्या रंगाचे म्हशी प्रत्येकी किमती ४०,०००/— रुपये प्रमाणे एकूण किमती ७,२०,०००/— रू २) आयशर क्रमांक एम एच २० जी सी ५८३४ किमती १०,००,०००/—. रू असा एकूण १७,२०,०००/—. रू चा माल मिळुन आल्याने आरोपी नामे—१) अब्दुल खालिक अब्दुल सईद वय ४९ वर्ष रा. मोमीनपुरा अंजनगाव सुर्जी अमरावती टेका नाका नागपूर २) सोहेल कुरेशी रईस कुरेशी वय २० वर्ष रा खान कॉलनी छिंदवाडा मध्य प्रदेश ३) नाझीम अहमद कुरेशी वय ३२ वर्ष रा समता नगर कराड हॉस्पिटल मागे संभाजीनगर यांचे विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३४ भादवी ११(१)(ड)(ज)(क),५,९ सहकलम १७९, १९२ मो वा का अन्वये गून्हा दाखल करण्यात आला आहे.**

**सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार,(भापोसे) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, मा. श्री. अनिल मस्के साहेब ,(भापोसे) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनात पो.नि. रवींद्र मानकर सोबत पोउपनि व्यंकटेश दोनोडे, अरून राठोड, पो.हवा. वासनीक, शेंदरे, नंदु मेश्राम, चालक लेंडे यांनी केली आहे**

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.**





**अवैध्य जुगार अड्डयावर धाड. ४ आरोपीवर कारवाई ४ फरार**
**एकुण ७०,७६०/—रू चा माल जप्त**

दिनांक ०५.०५.२०२४ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील अधिकारी व स्टॉफ हे पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनिय मुखबीरद्वारे माहीती मिळाली कि, नरखेड शेत टावुन काही इसम ५२ तासपत्तांच्या जुगार खेळ खेळत आहे. अश्या माहीतीवरून सदर ठिकाणी धाड टाकली असता घटनास्थळी आरोपी नामे— १) लवकेश ओमकार भुपती वय २७ वर्ष रा वरूड जि अमरावती २)

ताहिर खान उनाउल्लाह खान वय ३१ वर्ष रा वरूड जि अमरावती ३) परवेश किशोर बालपांडे वय २४ वर्ष रा पांढुर्णा मध्यप्रदेश राज्य ४) कमलेश किशन उईके वय ३१ वर्ष रा धनोडी ता वरूड जि अमरावती ५) फरार आरोपी नामे रत्नाकर तागडे रा नरखेड ६) फरार आरोपी नामे योगेश उईके रा मालखेड नरखेड ७) फरार आरोपी नामे योगेश आटनेरे रा शनिवार पेठ वरूड जि अमरावती ८) फरार आरोपी नामे विनोद उर्फ शाहु सांभारे रा जयस्तंभ चौक पांढुर्णा मध्यप्रदेश राज्य (फरार) असे घटनास्थळी ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आले. **१) एक व्हीवो व्ही २९ कंपनीचा मोबाईल फोन किमती २०,०००/—रू २) सॅमसंग ए २३ कंपनीचा मोबाईल फोन किमती २०,०००/—रू ३) ओपो ए ५५ कंपनीचा मोबाईल किमती फोन १०,०००/—रू ४) ओपो ए २३ कंपनीचा मोबाईल फोन किमती २०,०००/—रू ५) तासपत्ते कॅट ११ नग किमती ५५०/—रू ६) नगदी—५५०/—रू ७) हिरव्या रंगाची ताडपत्री किमती १०० रू असा एकुण ७०,७६०/—रू चा** माल जप्त करून ताब्यात घेतला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे) तसेच अप्पर पोलीस अधिक्षक मा श्री रमेश धुमाळ, मा. श्री. अनिल मस्के साहेब ,(भापोसे) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सहा पोलीस निरीक्षक प्रभारी ठाणेदार राकेश साखरकर पोलीस अंमलदार नितेश पुसाम यांचे पथकाने पार पाडली.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर